Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited A+

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र(भारत)
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**संदर्भ क्र. :** परीक्षा/समन्वय/२०२५/ 650

**दिनांक :** १६-०९-२०२५ 18

**प्रति,**

______________________
______________________
______________________
______________________

**विषयः** गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना द्यावयाचे सुवर्ण पदक तयार करून देणेसाठी दरपत्रके पाठविणेबाबत.

वरील विषयी कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन दिनांक १४ जानेवारी, २०२६ रोजी संपन्न होणार आहे. त्यानिमित्ताने गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना गुणवत्ता पदक (सुवर्ण पदक) वितरित करण्यात येतात. त्यासाठी सिलबंद पाकिटात खालील प्रमाणे दरपत्रक पाठवावे.

| अ. क्र. | सुवर्णपदकाचा तपशिल | सुवर्ण पदकांची संख्या | प्रती सुवर्ण पदक दर (रुपयांत) | सर्व करांसहीत १२ सुवर्ण पदकांची एकूण किंमत (रुपयांत) |
|---|---|---|---|---|
| १. | **सुवर्ण पदकः** १५ ग्रॅम चांदी व गोल्ड प्लेटींग व ईग्रविंग चार्जेस.<br>**आकारः** विद्यापीठाच्या साच्याप्रमाणे.<br>**जाडी आणि कडीः** विद्यापीठाने दिलेल्या नमुन्याप्रमाणे. | १२<br>(अंदाजे) | | |

उपरोक्त नमूद प्रमाणे गुणवत्ता पदक (सुवर्ण पदक) तयार करण्यासाठी लागणारा खर्च, मजुरी व इतर सर्व करांसह दरपत्रक सिलबंद पाकिटात संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००४ (म.रा.) यांचेकडे दि. ३०-०९-२०२५ रोजी सांयकाळी ०५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोचतील या बेताने पाठवावीत. त्यानंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. दरपत्रकासोबत जोडावयाची कागदपत्रांची यादी, नियम व अटी या पत्रासोबत जोडलेल्या आहेत. त्याप्रमाणे दरपत्रके पाठवावेत.

वरील दरपत्रक सादर करण्याच्या अनुषंगाने दोन लिफाफे सादर करणे आवश्यक आहेत. एका लिफाफ्यामध्ये फक्त दपरपत्रक व दुसऱ्या लिफाफ्यात सोबत जोडावयाचे कागदपत्र (कागदपत्रांची यादी मागील पानावर पहावी.) भरुन दोन वेगवेगळी लिफाफे सादर करण्यात यावी.

कुलसचिव

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## दरपत्रकासोबत जोडावयाच्या कागदपत्रे व सुवर्ण पदक तयार करण्यासंबंधीच्या अटी व नियम

| | |
|---|---|
| १. | दरपत्रके व्यवसायाच्या सर्व नियमांनुसार व अद्ययावत दुकान परवाना किंवा Udyam Registration, PAN Card छायांकित प्रत, GST नोंदणी प्रमाणपत्र, आयकर विवरणपत्र २०२४-२५ सह पाठवावेत. |
| २. | सर्व पदकांवर मागील बाजूस कोरावयाचा मजकूर हा वेगवेगळा आहे. तो मजकूर सोबत दिला जाईल. त्याप्रमाणे अचूक कोरीव काम झाले पाहिजे. |
| ३. | प्रत्येक पदकाच्या कडेवर (रीमवर) विद्यार्थ्याचे नांव कोरावयाचे आहे. (मजकूर विद्यापीठाकडून मिळेल). सुवर्णपदकासमोर १०० से.मी. लांबीची लाल रिबीन ज्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर असे छापलेले पाहिजे. |
| ४. | सुवर्ण पदक विद्यापीठाचा लोगो, देणगीदाराचे नांव तसेच विद्यार्थ्याच्या नावासहीत सूचक मांडणी आणि व्यवस्थत कोरीव कामासहीत तयार करून द्यावे. |
| ५. | विद्यापीठास सुवर्ण पदके देतांना सुवर्ण पदके विद्यापीठाच्या मागणीप्रमाणे (वजन, शुद्ध चांदी व सोन्याचा वापर केल्याचे) असल्याचे प्रमाणपत्र द्यावे लागेल. |
| ६. | सुवर्ण पदके तयार करण्यासाठी दिलेल्या यादीपेक्षा जास्तीचे सुवर्णपदक तयार करावे लागल्यास जास्तीच्या सुवर्णपदकांचे देयके नियमाप्रमाणे अदा करण्यात येईल. |
| ७. | विद्यापीठास सुवर्णपदके प्राप्त झाल्यानंतर आवश्यकता वाटलयास त्रयस्थांमार्फत तपासणी करून विद्यापीठाच्या मागणीप्रमाणे सुवर्णपदके तयार करण्यात आली आहेत असा अहवाल मिळाल्यानंतर तात्काळ देयके अदा करण्यात येईल. |
| ८. | एकदा सादर केलेले दर हे कायम राहातील. त्यात विद्यापीठाचे काम पूर्ण होईपर्यंत कोणत्याही प्रकाराचे बदल केले जाणार नाहीत. |
| ९. | काम करतांना झालेल्या नुकसानीस संबंधीत पुरवठादार जबाबदार राहील याबाबत विद्यीठाची जबाबदारी राहणार नाही. किंवा नुकसान भरपाई दिली जाणार नाही. |
| १०. | पुरवठादाराने दिलेल्या मुदतीत काम करणे आवश्यक आहे. विद्यापीठाने मागणी केलेल्या तारखेत दरपत्रके पाठविणे, त्यानुसार मागणी केलेल्या तारखेत सुवर्ण पदके पुरवठादाराने स्वखर्चाने पोहोच करणे बंधनकारक असेल. मुदतीनंतर पदके प्राप्त झाल्यास व विद्यापीठाच्या कार्यक्रमात व्यत्यय आल्यास शास्ती लावण्याचे अधिकार संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना राहातील. |
| ११. | पुरवठादाराचे दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे विद्यापीठ राखून ठेवत आहे. याबाबत कसल्याही प्रकारचा पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही. |

कुलसचिव